


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# आंदकोळ – एक आकलन

कु.स्नेहल विजयराव बोबडे

**सारांश :**

आंदकोळ हे अगदी अलिकडच्या काळात प्रसिद्ध झालेले आदिवासी साहित्यातील एक लक्षवेधक आत्मकथन आहे. या आत्मकथनात किसन चव्हाण यांनी आपला जीवनप्रवास वेधक भाषाशैलीमध्ये वस्तुनिष्ठ स्वरुपात मांडला आहे. एका पारध्याच्या पालात जन्म घेतलेल्या आणि त्यामुळे सगळ्या जगाचा तिरस्कार जन्मतः वाटेला आलेल्या एका उमद्या तरुणाची ही संघर्षमय जीवनगाथा आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन मुख्याध्यापक या पदापर्यंत पोहचलेल्या किसन चव्हाण यांची ही कहाणी अनेकांना प्रेरणादायी ठरणारी आहे.

जीवन कहाणी सांगता सांगता त्यांनी पारधी समाजावर अन्याय, अत्याचारांचे वास्तव असे वस्तुनिष्ठ चित्रण केले आहे. अन्याय अत्याचाराला वाचा फोडणारे असे हे एक आत्मकथन असून ते जातीधर्माच्या पलीकडे जावून सर्व वाचकांना भिडणार आहे. आपल्या जातीवरचा गुन्हेगारीचा इतिहास पुसून टाकून प्रामाणिकपणे काम करून उदरनिर्वाह करण्याची प्रेरणा या आत्मकथनातून किसन चव्हाण यांनी आपल्या जात बांधवांना दिली आहे. आशय विषय, व्यक्तीचित्रण, या सर्वच बाबतीत या आत्मकथनामध्ये विविधता दिसून येते. या आत्मकथनाचे वैशिष्ट्य म्हणजे ते फक्त दुःख, वेदना, यातना सांगून थांबत नाही तर आपल्या हक्क आणि अधिकारासाठी लढायला शिकवते आणि परिवर्तनाचा संदेश देते. सर्वच स्तरातील वाचकांना अस्वस्थ करते. तथागत गौतम बुद्धांनी सांगितलेला समतेचा पुरस्कार या आत्मकथनातून केला गेलेला आहे. या आत्मकथनामध्ये प्रचलित समाज व्यवस्थेवर अत्यंत वास्तववादी आणि भेदक असे भाष्य लेखकाने केलेले आहे.

प्रस्तुत आत्मकथनातील नायक फक्त स्वतःपुरता विचार करून थांबत नाही तर आपल्या समाज बांधवांसाठी चळवळ उभारून कार्य करतांना दिसतो. म्हणूनच हे आत्मकथन आदिवासी साहित्यातील महत्त्वाचे ठरले आहे.

**प्रस्तावना :-**

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यात अनेक साहित्य प्रवाह निर्माण झाले. दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य हे सर्व साहित्य प्रवाह मराठी साहित्याचा एक

भाग बनला आहे. या सर्व साहित्य प्रवाहात आदिवासी हा प्रवाह त्यातील वेगळ्या आशयामुळे लक्ष वेधून घेतो. स्वातंत्र्योत्तर काळात देशातील सर्वच समाजजीवन झपाट्याने बदललेले दिसून येते. आदिवासी जीवनही याला अपवाद नाही. आदिवासी जीवनात देखील स्वातंत्र्यानंतर अनेक बदल झालेले दिसून येतात. विविध शासकीय योजनांमुळे आदिवासी तरुण-तरुणी शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आलेले दिसून येतात.

जंगल दऱ्या-खोऱ्यात राहणारे आदिवासी शिक्षणाच्या निमित्ताने शहरात आले, शिक्षण घेऊन नोकरीला लागले. शिक्षण घेतल्यामुळे आदिवासी बांधवांना विविध साहित्याचा परिचय झाला आणि आपल्या व्यथा, वेदना ते साहित्यात मांडू लागले. कथा, कविता, कादंबरी, आत्मचरित्र या विविध साहित्य प्रवाहात आदिवासी लेखकांनी अत्यंत दर्जेदार साहित्यकृती निर्माण केलेल्या आहेत. त्यातीलच 'आंदकोळ' हे किसन चव्हाण यांचे आदिवासी साहित्यातील एक लक्षवेधक आत्मकथन आहे. त्याचा परिचय आपल्याला या शोधनिबंधात करून घ्यायचा आहे.

**आंदकोळ मधील जीवनसंघर्ष :-**

'आंदकोळ' या किसन चव्हाण यांच्या आत्मकथनातून त्यांच्या संघर्षाबरोबरच त्यांच्या आईवडिलांनी मुलांच्या शिक्षणासाठी केलेला संघर्षही दिसून येतो. आईवडिलांनी आंतरजातीय विवाह केल्यामुळे त्यांना जीवन जगण्यासाठी संघर्ष करावा लागतो. पारधी समाजात एक उच्च वर्णीय जातीतील स्त्री आल्यामुळे शिक्षणाचा एक विचार या समाजात निर्माण झाला. पारधी समाजात जन्म झालेल्या किसन चव्हाण यांच्या जीवनात जातीमुळे होणारे अन्याय, अत्याचार त्यांचे जीवन संघर्षमय बनवते.

'आंदकोळ' या आत्मकथनाच्या प्रस्तावनेत सांगितल्या प्रमाणे आंदकोळ म्हणजे एक 'न थांबणारं वादळ'[१]. किसन चव्हाण यांनी समाजातील व्यवस्थेशी सतत झगडून, सतत संघर्ष करून, सततचा लढा देऊन एक आंदकोळ निर्माण केले. गुन्हेगारीची, चोरी, दरोडेखोरांची जात म्हणजे पारधी जात. मुलांनी शिकावं म्हणून आईवडिलांनी चोऱ्या करून, दारू विकून मुलांना शाळेत दाखल केले पण जात काही त्यांची पाठ सोडेना. किसन चव्हाण हे शाळेत असतांना सुद्धा त्यांच्याकडे सर्वजण संशयाच्या नजरेने बघत असतात त्यामुळे त्यांना शिक्षण घेतांना सुद्धा संघर्ष करावा लागला. दहावीला असतांना एका प्रसंगात चुकी नसतांनाही त्यांना शिक्षा भोगावी लागली.

किसन चव्हाण हे शिक्षणात तरबेज असल्यामुळे पुढे ते डी.एड. करण्यास अध्यापक विद्यालयात प्रवेश घेतात. तेथील वसतिगृहात राहत असतांना तेथील त्यांच्या जातीवरून

त्यांच्याकडे चोरीच्या नजरेने सर्व विद्यार्थी बघायचे परंतु लेखकाच्या अभ्यासातील हुशारीमुळे व चांगल्या वागणुकीमुळे मुलांचे गैरसमज दूर झाले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर किसन चव्हाण यांनी ज्या शाळेत शिक्षण घेतले त्याच शाळेत ते शिक्षक पदावर नोकरीला लागले. तेथेही त्यांना जातीवरून संघर्ष करावा लागला. किसन चव्हाण यांच्या मनात नोकरी लागल्यावरही त्यांना जातीवरून मिळालेली वागणूक, त्यांच्या समाजावर झालेला अत्याचार हे सर्व जिवंत होते. म्हणूनच त्यांनी भटक्या विमुक्त जमातीसाठी कार्य करण्याचे ठरवले. परंतु ते कार्य करतांनाही उच्च जातीकडून मिळालेली वागणूक त्यांच्या या प्रवासाला कठीण बनवते. या सर्व अडचणींना तोंड देऊन ते शाळेचे मुख्याध्यापक बनतात. पारधी जातीत जन्मलेल्या एका साधारण मुलापासून ते शाळेचा मुख्याध्यापक बनण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास संघर्षमय दिसून येतो.

**आंदकोळ मधील व्यक्तिरेखा :-**

**१) जगू :**

जगू हे किसन चव्हाण यांचे वडील आहेत. जातीने पारधी असले तरी त्यांच्यात कष्टाळूपणा, प्रामाणिकपणा दिसून येतो. आंतरजातीय विवाह केल्यामुळे घरातील सर्व मंडळींनी त्यांना विरोध केला. घरातील सर्व लोक त्यांना दुसरे लग्न करण्यास प्रवृत्त करीत होते परंतु ते स्वतःशी ठाम राहले यातूनच त्यांचा प्रामाणिकपणा दिसून येतो. या बाबतीत किसन चव्हाण म्हणतात, 'दादा अडाणी. गुन्हेगारीचा कलंक लागलेल्या जमातीतले पण तथाकथित उच्च म्हणवणाऱ्या समाजातही आमच्या बापाइतका प्रामाणिकपणा, नितीमत्ता, सुसंस्कृतपणा बघायला मिळणार नाही'[२]. मुलांच्या शिक्षणासाठी चोऱ्या करून, दारू विकून मुलांचे शिक्षण पूर्ण केले. यातून त्यांची कष्टाळू वृत्ती दिसून येते आणि याच सर्व गुणांमुळे त्यांना 'जगू पारधी' ऐवजी 'जगू भाऊ' म्हणून ओळखले जाऊ लागले.

**२) यमुना :**

यमुना ही किसन चव्हाण यांची आई आहे. तिचे व्यक्तिमत्व कणखर आहे. उच्च जातीतून पारधी जातीत लग्न करून तीने हा कणखरपणा दाखवला आहे. नवरा चोरी करण्यासाठी गेल्यावर मागे समाजाला तोंड देण्यासाठी ती एकटी उरलेली असायची यातून ती एक बहाद्दर स्त्री असल्याचे दिसून येते. यमुना ही उच्च जातीतून आल्यामुळे तिला शिक्षणाची आणि शिक्षणामुळे होणाऱ्या बदलाची जाणीव होती. त्यामुळे ती मुलांना शिकवण्याचा हट्ट धरते.

'पोटाला बिबे घालीन, भिक मागीन पण लेकरांना शिकवीन'. (पृ.२४) यमुनाने आपल्या संसारासाठी, मुलांच्या शिक्षणासाठी केलेला त्याग संस्मरणीय आहे.

**३) किसन चव्हाण :**

किसन चव्हाण हे आंदकोळ मधील एक प्रभावी व्यक्तिमत्व आहे. अत्यंत कष्टाळू, प्रामाणिक, होतकरू असून, शिक्षणाबरोबरच त्यांनी भटक्या विमुक्त जमातीसाठी कार्य केले आणि एक आंदकोळ निर्माण केले. त्यांचे जीवन हे खूप संघर्षमय होते पण संघर्षाला न घाबरता त्यांनी समाजात जागा निर्माण केली. म्हणूनच किसन चव्हाण हे आंदकोळ आत्मकथनातील प्रमुख आणि प्रभावी व्यक्तिरेखा आहे. किसन चव्हाण यांना भटक्या विमुक्त जमातीच्या कार्यासाठी दिल्लीचा भारतीय दलित साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. 'दुसऱ्याचे अश्रू पुसणारा माणूस हा धनवानांपेक्षाही सामाजिक दृष्ट्या विचाराने श्रीमंतच असतो'. (पृ.६३ ) असे उद्गार किसन चव्हाण यांच्याबद्दल आले आहे. किसन चव्हाण यांनी वाचकांच्या मनात एक प्रेरणादायी स्वतःच्या हक्कासाठी लढण्याचे एक आंदकोळ निर्माण केले.

**४) सुनिता :**

सुनिता ही किसन चव्हाण यांची पत्नी आहे. लहान कुटुंबात जन्म घेऊन लग्नानंतर मोठ्या कुटुंबाला सांभाळण्याची कला तिच्यामध्ये दिसून येते. ती अत्यंत मनमिळाऊ, कष्टाळू असल्याचे दिसते. घरातील भाऊ मरण पावल्यामुळे संपूर्ण जबाबदारी सुनीतावर आली. उच्च शिक्षण घेतल्यामुळे नोकरी करून तिने घर चालवले. अशातच तिचा किसन चव्हाण यांच्याशी आंतरजातीय विवाह झाला. विवाह झाल्यानंतर किसन चव्हाण यांचे मोठे कुटुंब सांभाळले. पारधी समाजात लग्न करून तीही किसनच्या आईप्रमाणे एक बहाद्दर स्त्री बनली.

**५) संजू :**

संजू हे किसन चव्हाण यांचे भाऊ आहेत. हे सुद्धा शिक्षण घेऊन शिक्षक म्हणून नोकरी करत होते. संजू घर आणि नोकरी एवढेच करत होता. त्याला किसनने भटक्या जमातीसाठी कार्य केलेले आवडत नव्हते. परंतु एक दिवस ज्या उच्च वर्णीय जमातीतील शाळेत ते शिक्षक म्हणून नोकरी करीत होते तेथे त्यांना जातीवरून वाईट अनुभव आला आणि तेही किसन चव्हाण यांच्यासोबत भटक्या विमुक्त जमातीसाठी कार्य करू लागले.

**गौण व्यक्तिरेखा :**

आंदकोळ या आत्मकथनामध्ये काही गौण व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. त्यामध्ये आपृकबाई, कांताबाई, सिंधू, अंजन, साखराबाई ही कुटुंबातील सदस्य आहेत. त्याचप्रमाणे कोल्हे गुरुजी, वायदंडे गुरुजी, कनके गुरुजी, बोडखे गुरुजी हे सर्व शिक्षक यामध्ये आलेले दिसून येतात. जनार्दन पवार, संजय नेव्हल, राजू मिसाळ, बापू कांबळे, संभाजी घुले, मधु कांबळे ही सर्व लेखकाच्या मदतीला धावणारे वर्गमित्र आहेत. त्याचप्रमाणे 'कमलाकर पिंपळे म्हणजे पारधी समाजाचा आधारच ही व्यक्तिरेखा आली आहे'. (पृ.५४ ) गावातील मोठे व्यक्तिमत्व म्हणजे घुले साहेब होय. घुले साहेबांचा वाडा म्हणजे पंचक्रोशीतील न्यायालयच |. (पृ.५६ ) त्याचप्रमाणे साहित्यातील एक मोठ नाव म्हणजे लक्ष्मण माने आहे. आंदकोळ मध्ये ही व्यक्तिरेखा महत्वाची आहे. अशा प्रकारे ही सर्व मुख्य आणि गौण पात्रे आंदकोळ या आत्माकथनाला वाचनीय बनवतात.

**प्रसंगचित्रण :-**

प्रसंगचित्रण साहित्याचा मुख्य घटक असतो या घटकाशिवाय कोणतेही साहित्य हे अपूर्णच असते. वाचकाला साहित्याच्या जवळ आणणारा हा घटक असतो. आंदकोळ या आत्मकथनामधील प्रसंग हे भावस्पर्शी वाचकांच्या मनाला भिडणारे आहे. किसन चव्हाण यांनी त्यांच्या वसतिगृहातील एक प्रसंग सांगितला आहे. या दृष्टीने खालील प्रसंग पाहण्यासारखा आहे.

"सुरवातीला वसतिगृहात राहायला गेल्यानंतर जेव्हा इतर मुलांना आमची जात कळाली तेव्हा संजुभाऊ आणि मला सारखेच अनुभव आले. बाहेर जायच्या वेळेस, झोपायच्या वेळेस खोलीतील मुलं त्याचं सगळ सामान अगदी ताट-वाट्यासह पेटीत कुलूप लावूनच ठेवायची. मी कॉलेजवरून खोलीत आलो की, मूलं डोळ्यानं खुणवत. हे सगळं समजायचं, पण करणार काय ? त्यांचाही दोष नव्हता 'जात' च चोर म्हणून बदनाम झालेली. आम्ही कधीच कोणाच्या वस्तूला हात लावत नसायचो. पण कितीही शहाजोगपनानं वागलो तरी इतरांच्या नजरेत मात्र आम्ही चोर जातीचेच ना ---!"[३]

प्रस्तुत प्रसंगातून लक्षात येते की, शिक्षण घेऊन कितीही मोठे व्हा पण जात तुमची पाठ सोडणार नाही. "इथल्या समाजात तुम्ही किती गुणवत्ता धारक आहात यापेक्षा कोणत्या जातीचे आहात हे महत्वाचे आहे". (पृ.११९)

**भाषाशैली :**

साहित्यामध्ये भाषाशैलीला एक प्रमुख घटक म्हणून बघितले जाते. भाषाशैलीमुळेच कोणतीही साहित्यकृती वाचकासमोर व्यक्त होते. किसन चव्हाण यांची भाषाशैली ही साधी, सरळ, प्रभावी आहे. काही ठिकाणी बोलीभाषेचा वापर केलेला दिसून येतो. तर काही ठिकाणी म्हणींचाही वापर करण्यात आलेला आहे. याद्दष्टीने काही उदाहरणे पाहण्यासारखी आहेत. ती खालीलप्रमाणे :-

१. "बां आंदकोळ छुटीच आंदकोळ, वड्डेलसू आवाज करती आई रीहीज छीयावन पालम बोलय".[४]

२. "आरे संज्या, किसन्या, नासो, नासो, धूम ठोको, पालम आवो आंदकोळ आईच आंदकोळ" [५]

३. "घाबरशो ना, गेई आंदकोळ गेई"[६]

४. "बा, वाढढ्या आयाच नसी जा" [७]

५. "मालक नो गाडी आयी रिहोच, ड्रम लवकांडी दं, वती दं दारू"[८]

६. "बा, श्यान बोलायतो वादाप्र, गेयोतो, माऱ्यागिऱ्यो तो निही नी"[९]

७. "दारू नं वास्तन निही बोलायचो, किसन वास्तन बोलायतो कालथो हजर हुआन काह्युच दहीगाव शी शाळ पर"[१०]

प्रस्तुत उदाहरणे ही पारधी बोलीभाषेतील आहेत. किसन चव्हाण यांनी वाचकांना या बोलीभाषेचा अर्थ कळावा यासाठी वाक्यांच्या समोर कंसात मराठीमध्ये अर्थ दिलेला आहे. त्याचप्रमाणे या अत्मकथनामध्ये काही म्हणींचाही उपयोग करण्यात आलेला आहे तो पुढीलप्रमाणे:-

१. "भिक नको पण कुत्र आवर" (पृ.४५)

२. "हातच्या कंकणाला आरशाची गरज काय"? (पृ.४३)

३. "राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला"(पृ.२०)

४. "अब्रूही झाकता येईना अन माशाही मारता येईना" (पृ.२०)

या भाषाशैलीने प्रस्तुत आत्मकथनास वाचनीयता प्राप्त करून दिली आहे. बोलीभाषेचा वापर संवादात्मक्ता, अलंकारिता हे अत्माकथनमधील भाषाशैलीचे विशेष दिसून येतात.

**समाजदर्शन :-**

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. सोबतच ते समाजाभिमुख असते. साहित्याचे समाजाशी अत्यंत निगडीचे नाते दिसून येते. आत्मकथा हा साहित्य प्रकार समाजाशी, त्यातील

घटनांशी जवळीक साधतो. किसन चव्हाण यांच्या आंदकोळ या आत्मकथनात समाजाचा एक आगळा-वेगळा चेहरा दिसून येतो. समाजाचा, राजकारणाचा, लोकशाहीचा आणि पोलीस प्रशासनाचा पारधी समाजावर होणारा अत्याचार या आत्मकथनातून दिसून येतो. कोठेही चोरी, दरोडा पडला तर पोलीस या समाजावर संशय घेऊन त्यांना अटक करून घेऊन जायचे आणि खोट्या गुन्ह्यात अडकून ठेवायचे. पोलीस कोठडीत हैवानासारखे या समाजातील लोकांशी वागायचे. यातून पोलीस प्रशासनाचे दर्शन घडते. देशाला स्वातंत्र्य मिळालं , लोकशाही अस्तित्वात आली परंतु भटक्या विमुक्त जातींना माणूस म्हणून वागण्याचे स्वातंत्र्य मिळाले नाही असे दिसून येते.किसन चव्हाण हे स्वातंत्र्यावर प्रश्न निर्माण करतांना या अत्मकथनात दिसून येतात. हे स्वातंत्र्य, ही लोकशाही, हा समाज खरच या भटक्या विमुक्त समाजासाठी आहे का? असा प्रश्न ते उपस्तीत करतात.

**जातीविषयक चिंतन :-**

किसन चव्हाण यांचा जन्म पारधी जातीत झाल्यामुळे त्यांना जीवन जगतांना खूप मोठ्या संघर्षाला सामोरे जावे लागले. आपला समाज हा अनेक जातींमध्ये विभागला असल्यामुळे काही जातींना श्रेष्ठ समजले गेले आहे व काही जातींना कनिष्ट समजले गेले आहे आणि या सर्व जातींमध्ये उच्च-निच्च स्वरूपाचा संघर्ष दिसून येतो तो संघर्ष किसन चव्हाण यांच्या वाटेला आला. काही चूक नसतांना लोक त्यांच्याकडे संशयाने बघायचे प्रामाणिकपणे काम करूनही त्या कामाचे कौतुक होत नसे. साहजिकच या संदर्भात किसन चव्हाण यांनी अंतर्मुख होऊन चिंतन केलेले दिसून येते आणि हे चिंतन प्रस्तुत आत्मकथनाची मौलिकता वाढविते या संदर्भात किसन चव्हाण यांनी जाती व्यवस्थेवर जे परखड भाष्य केले आहे ते पाहण्यासारखे आहे.

"मी मात्र खूप अस्वस्थ झालो होतो. काय म्हणावं या जातीव्यवस्थेला ? प्रत्येकाला आपल्या जातीचा अभिमान. ज्या जातीला समाजात मान, सन्मान, प्रतिष्ठा आहे तिच्याबद्दल अभिमान बाळगला तर समजू शकतो. ब्राम्हण, मारवाडी, मराठा या जातींमुळे तोटे होत नाही झालेच तर फायदेच होतात पण मी अन माझी जात की ज्या जातीबद्दल बाप म्हणत होता की जातीसाठी माती खावी, महारांच्या पंगतीला बसवतोस काय, ती जात जातींच्या उतरंडीत कुठं आहे? या व्यवस्थेत माझ्या जातीला काय स्थान आहे? जंगलात माळरानावर चार-दोन पारध्यांनी पालं जरी टाकली तरी आसपासच्या चार-दोन गावातील लोक जमा होणार, दम देणार, हुसकावून लावणार ! ना गाव, ना शिवार, ना घर ! जनावरांसाठी कोठे गोठे तरी असतात, झाडावरती पाखरे ही घरटे करून राहतात, आपली काय गत आहे? गावात

गेलं तरी रस्त्यानं कुत्र्यांचा लोहोट लागतो मागं ... गावातल्या कुत्र्यांनाही आपली जात कळते ! चोर, दरोडेखोर, भिकार-भणंग ह्याशिवाय काय आलंय वाट्याला? तुच्छता, अवहेलना, अपमान हेच पदरात पडलंय ! एखाद्या बिनलग्नाच्या वेड्या पोरीवर बलात्कार व्हावा अन त्यातून तिला मुल व्हावं अन त्याचंच तीनं कोडकौतुक करावं तसंच माझ्या जातीचं ! समाजव्यवस्थेत कुठंच स्थान नाही, कुणीही विचारत नाही, विचारलंच तर अगदी तुच्छतेने आणि तिरकसपणे! तरीही ब्राम्हणाला जसा त्याच्या जातीचा अभिमान तसाच माझ्या बापाला त्याच्या जातीचा अभिमान". [११]

प्रस्तुत चिंतनातून पारधी जातीला समाज व्यवस्थेत कुठेच स्थान नाही हे लक्षात आणून दिले. किसन चव्हाण यांनी जाती व्यवस्थेवर केलेले बेधडक भाष्य योग्य आहे असे वाटते.

**मूल्यमापन :-**

आगळावेगळा आशय , लक्षवेधक प्रसंगचित्रण , आशयानुरूप भाषाशैली इत्यादी विशेषांमुळे हे आत्मकथन लक्षवेधक ठरले आहे. या आत्मकथनामुळे अनेकांना प्रेरणा मिळाली आहे . कित्येक लोक लढण्यास तयार झाले आहेत ही या आत्मकथनाची मैलिकता आहे . या आत्मकथनाबद्दल उत्तम कांबळे म्हणतात , "आपल्या यशोगाथेचं, आपल्या शौर्याचं सार्वत्रिकीकरण करण्यासाठी किसननं भटक्या – विमुक्तांच्या चळवळीत भाग घेतला . नगर जिल्यात शेकडो कुटूंब स्थिर करण्याचा प्रयत्न केला . त्यांच्या समोरही नव्या स्वप्नासाठी एक नवी पाटी आहे . कुणीतरी हातात खडू धरतं . दोन – तीन बोटात आवळतं . अक्षर गिरवतं . या साऱ्यावर कळस करतं ते ' आंदकोळ ' ....[१२]

उत्तम कांबळे यांचे हे मत अगदी योग्य आहे.

त्याचप्रमाणे अरुण जावळे हे ही स्वत:चे मत मांडताना दिसतात ते म्हणतात, "आंदकोळ हे केवळ आत्मकथन नाही , तर समाजव्यवस्थेची चिरफाड करणारं ते एक भेदक भाष्य आहे . इथल्या व्यवस्थेनं जन्मजात गुन्हेगार ठरविलेल्या आणि गावाबाहेरच कायम मुक्कामाला असणाऱ्या ' पारधी' जातीत लेखकाचा जन्म झाला असल्यामुळे गावाकडे आणि एकूणच समाजाकडे पाहण्याची तटस्थ दृष्टी त्याला लाभली आहे .त्यामुळे त्याने केलेले निरीक्षण वास्तवदर्शी ठरले आहे . या जातीत स्वातंत्र्यानंतर आजही माळरानावर टाकलेल्या पालात पोलीसांच्या व समाजाच्या भितीपोटी रात्री उजेडाचा दिवा लागत नाही . परंतु लेखकाच्या आईवडिलांनी त्यांच्या वाट्याला आलेल्या नरकयातना मुलांच्या वाट्याला येऊ नये म्हणून मुलांना शिक्षण देऊन पालात ज्ञानाचा दिवा लावला ... एक दिवा पेटला ... एक मेणबत्ती पेटली

कि हजारो मेणबत्त्या पेटवता येतात आणि मग काय ? त्याच मेणबत्त्या काळ्याकुट्ट अंधाराला छेदून प्रकाशच प्रकाश देतात . किसन चव्हाण आणि त्यांचे भाऊ उच्च शिक्षण घेऊन जातीला लागलेला गुन्हेगारीचा कलंक पुसून स्वाभिमानानं उभं राहून इथल्या विषमतावादी व्यवस्थेशी दोन हात करतात आणि अन्नासाठी पिढ्यानपिढ्या गावगन्ना भटकणाऱ्या समाजाचा देदीप्यमान दिग्विजय साकार करतात !” [१३]

अरुण जावळे यांचे मत वाचकांच्या मनाला भिडले आणि ‘ आंदकोळ ’ ची चर्चा सगळीकडे सुरु झाली आणि मलाही त्यांचे मत योग्य वाटते.

**समारोप :-**

अशाप्रकारे ‘आंदकोळ ’ हे अलिकडच्या काळात प्रसिद्ध झालेले महत्त्वाचे आत्मकथन असून सर्व स्तरावरील वाचकांना त्यापासून प्रेरणा मिळाली आहे. इतरांना जगण्याची प्रेरणा देणे हेच खरे आत्मकथनाचे प्रयोजन असते आणि ते प्रयोजन या आत्मकथनातून सिध्द झाले आहे . ज्याप्रमाणे जमिनीला फोडून बाहेर आलेला कोंबच पुढे जाऊन मोठा वृक्ष बनतो (पृ.१६३) त्याचप्रमाणे किसन चव्हाण यांनी संघर्ष करून ‘ पारधी ’ समाजाला समाजात स्थान देण्यात प्रयत्न केलेला दिसून येतो . आणि याच संघर्षाच्या भावनेतून वाचकाला हे आत्मकथन प्रेरणा देते . म्हणूनच आंदकोळ हे आत्मकथन चिरस्मरणीय राहील.

**निष्कर्ष :-**

१. किसन चव्हाण यांनी ‘आंदकोळ’ या आत्मकथनातून पारधी समाजाचे सगळेच पैलू मांडले आहे.

२. ‘आंदकोळ’ मधील प्रसंगातील जिवंतपणा यामुळे हे आत्मकथन वाचनीय ठरले आहे.

३. पोलीस प्रशासन, लोकशाही, राजकारण या सर्वांकडून झालेल्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडणारे ‘आंदकोळ’ हे आत्मकथन आहे.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच तथागत गौतम बुद्ध यांचे विचार आणि त्यामुळे भटक्या विमुक्त समाजात होणारे बदल आंदकोळ या आत्मकथनात आढळून येतात.

५. हे आत्मकथन जातीधर्माच्या पलीकडे जाऊन सर्वच स्तरावरील वाचकांना प्रेरणा देते.

६. भटक्या विमुक्त जमातीचा सूक्ष्मतेने अभ्यास करणे आवश्यक आहे.

७. पारधी समाजावर अन्याय अत्याचाराचे वास्तव असे चित्रण या आत्मकथनात आलेले आहे.

**संदर्भ टीपा :-**

१) चव्हान किसन, आंदकोळ, ग्रंथालय प्रकाशन, मुंबई. आवृत्ती दुसरी २०१६, पृ.५

२) तत्रैव-पृ.१२

३) तत्रैव-पृ.३५

४) तत्रैव-पृ.१

५) तत्रैव-पृ.२

६) तत्रैव-पृ.२

७) तत्रैव-पृ.५

८) तत्रैव-पृ.४५

९) तत्रैव-पृ.४६

१०) तत्रैव-पृ.४६

११) तत्रैव-पृ.१३१

१२) कांबळे उत्तम - आंदकोळ उनि. पृ.१६८

१३) जावळे अरुण – आंदकोळ उनि. पृ.१६८